**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठात बांबू हस्तकला व कला केंद्राची स्थापना**
**अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी अर्ज आमंत्रित**

अमरावती-

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात बांबू हस्तकला व कला केंद्राची स्थापना झाली असून विद्यापीठाचे कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांचे शुभहस्ते उद्घाटन संपन्न झाले. सदर प्रकल्प महाराष्ट्र राज्याचे अर्थ, नियोजन व वने मंत्री ना.श्री. सुधीर मुनगंटीवार यांचे पुढाकाराने व कुलपतींच्या संकल्पनेतून साकार झाला असून महाराष्ट्र शासन 'जिल्हा नियोजन समिती नाविन्यपूर्ण योजना' या शीर्षातून उभारण्यात आला आहे. कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या विशेष प्रयत्नातून विद्यापीठात हा प्रकल्प साकारण्यात आला आहे.

केंद्रांतर्गत 'स्टार्टअप प्रोग्राम इन द फील्ड ऑफ बांबू' व 'इंट्रोडक्शन टू बांबू स्टार्टअप' हे दोन अभ्यासक्रम सुरु करण्यात येत असून अभ्यासक्रमाला प्रवेशित होण्यासाठी इच्छुकांनी दि. २० ऑक्टोबर, २०१८ पर्यंत बांबू हस्तकला व कला केंद्राचे समन्वयक डॉ. प्रशांत गावंडे यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ९४०३६२२५६८ वर संपर्क साधावा. सदर अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती व अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याकरीता करावयाचा अर्ज विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी इच्छूक विद्यार्थ्यांनी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. अजय देशमुख व बांबू हस्तकला व कला केंद्राचे समन्वयक डॉ. प्रशांत गावंडे यांनी केले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ११/१०/२०१८.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी